आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक २४ वा ● शुक्रवार दि. ११ जुलै २०२५ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●




## ❋शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात अभ्यास समिती गठीत❋ ❋सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची विधानसभेत घोषणा❋

मुंबई : शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य व्हावे,



त्याच्या जीवनात आर्थिक उन्नती साधण्यासाठी राज्य शासन संवेदनशीलपणे काम करीत आहे. याच अनुषंगाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असल्याची घोषणा सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत केली.

विधानसभेत विरोधी पक्षांनी नियम २९३ अन्वये मांडलेल्या प्रस्तावास उत्तर देताना सहकार मंत्री श्री. पाटील बोलत होते.

मंत्री श्री. पाटील यांनी सांगितले, राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आणि शेतीविषयक इतर मुद्द्यांचा आढावा घेण्यासाठी नुकतीच सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, कृषी, पणन, वन आणि मत्स्य व्यवसाय मंत्री यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भातील योजनांची अंमलबजावणी, वितरित निधी आणि प्रलंबित प्रकरणांचा सखोल आढावा घेण्यात आला.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना – २०१७ यामध्ये कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. या योजनेअंतर्गत जुलै २०२० पर्यंत २६.१७ लाख शेतकऱ्यांसाठी १५,३४९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. यापैकी २४.८८ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १३,७०५ कोटी रुपये थेट लाभ देण्यात आला आहे. तसेच प्रोत्साहनपर लाभासाठी १७.२२ लाख शेतकऱ्यांना २७७३ कोटी मंजूर करण्यात आले असून १४.८९ लाख शेतकऱ्यांना थेट बँक खात्यात २४२७ कोटी वितरित करण्यात आले.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०१९ अंतर्गत दोन लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या योजने मध्ये ३२.४४ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले. यापैकी ३२.३३ लाख कर्जखात्यांना लाभ देण्यासाठी २०,५३७ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली. यापैकी ३२.२७ लाख कर्जखात्यांवर २०,४९७.५३ कोटी जमा करण्यात आले आहेत. या योजनेची अंमलबजावणी ९९ टक्के पूर्ण झाले आहे उर्वरित प्रकरणांवरही लवकरच कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. सन २०१७–१८, सन २०१८–१९ आणि सन २०१९–२० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करून नियमित परतफेड केलेल्या पात्र शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत कमाल ५० हजार रुपये पर्यंतच्या रकमेचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येतो.

या योजनेअंतर्गत १५.४० लाख कर्जखात्यांना योजनेचा लाभ देण्याच्या अनुषंगाने ५२२२ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली असून त्यापैकी १४.३८ लाख कर्जखात्यांवर ५२१६.७५ कोटी इतक्या रक्कमेचा लाभ प्रत्यक्ष वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरित कर्जखात्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला आहे. योजनेची अंमलबजावणी अधिक गतिमान व कार्यक्षम करण्यासाठी अभ्यास समिती गठीत करण्यात आली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# रेल्वेच्या जागेचे हस्तांतरणातील अडचणी सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करावे !

मुंबई (प्रतिनिधी) लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या विस्तारासाठी रेल्वे विभागाची जागा हस्तांतरीत करण्यासाठी, वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी पुढाकार घेऊन मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवारी विधानसभेत बोलताना केली.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान गुरुवार दि. १० जुलै २५ रोजी विधानसभेत हा विषय उपस्थित करताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या लगत असलेली रेल्वे विभागाची जागा देण्याचा आणि त्या बदल्यात रेल्वे विभागाला इतरत्र जागा देण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी घेतला होता, अद्याप या जागेची अदलाबदल झाली नसल्यामुळे सदरील महाविद्यालयाच्या आणि रुग्णालयाच्या विस्तारात, आरोग्याच्या सुविधा उभारण्यात अडचणी निर्माण होत आहेत. जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी स्थापन झालेले विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ठिकाणी आता सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलची उभारणी झाली आहे, वेगवेगळ्या विभागाची रुग्णालय येथे उभारली गेली आहेत, विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल्स बांधण्यात येत आहेत, बाह्य रुग्णविभागाचे बांधकाम सुरू होणार आहे, या




महाविद्यालयाचा भविष्यातील विस्तार लक्षात घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांनी, लगत असलेली रेल्वे विभागाची जागा या महाविद्यालयास व रुग्णालयास देण्याचा व त्या बदल्यात राज्य शासनाची इतर ठिकाणची जागा रेल्वे विभागाला देण्याचा निर्णय घेतला होता, पुढे रेल्वे विभागाला या जागेच्या बदल्यात जागा न मिळाल्यामुळे, रेल्वे विभागाकडून महाविद्यालयास जागा हस्तांतरित करण्यात आलेली नाही, लातूरचे रेल्वे स्टेशन आता शहराबाहेर गेलेले असल्यामुळे महाविद्यालय लगतची जागा सध्या रिकामीच आहे, रेल्वे विभागाला पर्याय जागा मिळाल्यास ही जागा लगेच हस्तांतरीत होणार आहे.

राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री मा. हसन मुश्रीफ यांनी राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय देवेंद्रजी फडणवीस, लातूर जिल्ह्यातील सर्वच आमदार, खासदार त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण विभाग आणि रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करून रेल्वे विभागाची जागा विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आमदार देशमुख यांनी यावेळी केली. राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी अशी बैठक आयोजित करून निर्णय घेण्याबाबत यावेळी अनुकूलता दर्शवली आहे.

धर्मादाय रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णावर उपचार करण्यात होणाऱ्या दिरंगाईबाबतचा मुद्दाही यावेळी आमदार अमित देशमुख यांनी यावेळी उपस्थित केला, धर्मादाय रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णावर योग्य वेळेत उपचार होण्यासाठी शासनाने नियम केले आहेत त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश यावेळी सभापती राहुल नार्वेकर यांनी दिले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी यासंदर्भात स्पष्टीकरण देताना, धर्मादाय रुग्णालयातील उपचाराच्या संदर्भाने लक्ष ठेवण्यासाठी व सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती स्थापन केली असून यापुढे कुठल्याही रुग्णाच्या उपचारात दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे सांगितले.

उद्योग आणि कारखान्यात होणाऱ्या अपघातात दरवर्षी मोठी मनुष्यहानी होत आहे, ती टाळण्यासाठी शासनाने फायर फायटिंग आणि इतर सुरक्षेच्या यंत्रणेबाबत दरवर्षी कन्सेंट टू ऑपरेट ही सिस्टीम सुरू करावी, अशी मागणीही माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विधानसभेत बोलताना केली आहे.

# उघड्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही

लातूर /प्रतिनिधी :शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांच्या विरोधात मनपाकडून कारवाई केली जात आहे.या अंतर्गत शहरातील प्रभाग क्रमांक १८ मध्ये नागरिकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

मनपाच्या वतीने शहरात दैनंदिन कचरा संकलन केले जाते. तरीसुद्धा काही ठिकाणी नागरिक उघड्यावर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास येत आहे.यामुळे मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली.



प्रभाग क्रमांक १८ मधील दुर्गादेवी चौक येथे कचरा उघड्यावर टाकल्याचे निदर्शनास आल्यानंतर मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे,प्रमुख स्वच्छता निरीक्षक धोंडीबा सोनवणे, स्वच्छता निरीक्षक चंद्रकांत भोसले, संतोष रणदिवे व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. शहरातील नागरिकांनी आपल्याकडील कचरा ओला व सुका असे वर्गीकरण करून घंटागाडीतच टाकावा. यापुढे उघड्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा पालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

नेहमी कचरा पडणारी ठिकाणे स्वच्छ करून त्या ठिकाणी वाचन कट्टा व वृक्ष लागवड करण्याचा उपक्रम पालिकेने हाती घेतला आहे. या अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील झिंगणप्पा गल्ली भागात अग्रसेन भवन, प्रभाग क्रमांक ९ मध्ये बसवेश्र्वर महाविद्यालय व प्रभाग क्रमांक १२ मधील चंद्रोदय कॉलनी येथे स्वच्छता करून वाचनकट्टा तयार करण्यात आला. वृक्ष लागवड ही करण्यात आली.यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख,रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी विजय राजूरे, प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख,रवी कांबळे,डी.एस सोनवणे,स्वच्छता निरीक्षक अमजद शेख,मनाहेर शिंदे,अमोल मगर,देवेंद्र कांबळे,महादेव फिस्के,गजानन सुपेकर,शिवाजी कुटकर,सुरेश कांबळे,धनराज गायकवाड, बालाजी राऊत व मुन्ना पाल उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात गुरु पौर्णिमेनिमित्त आयोजित वृक्ष लागवड मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद !

लातूर, : जिल्ह्यातील वन क्षेत्राचे अत्यल्प प्रमाण लक्षात



घेवून यंदाच्या पावसाळ्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट जिल्हा प्रशासनाने निश्र्चित केले आहे. त्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत जिल्ह्यात १० जुलै रोजी गुरु पौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध शासकीय कार्यालयांचा परिसर, रस्त्याच्या दुतर्फा आणि शाळा, ग्रामपंचायत स्तरावर वृक्ष लागवड करण्यात आली. लातूर तालुक्यातील अंकोली येथे प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या उपस्थितीत ५ हजार वृक्ष लागवड कार्यक्रमाला सुरुवात झाली.

उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, वन परिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे, वन परिमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक बालाजी पाटील, महेश पवार, गोविंद घुले, सरपंच समाधान आडगळे, उपसरपंच सुधाकर गवळी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

गुरुपौर्णिमेनिमित्त १० जुलै रोजी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होवून आपल्या घराच्या परिसरात, गावात वृक्ष लागवड मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमकरकर यांनी केले होते. जिल्ह्यातील शाळा, आरोग्य संस्था, तलाव, सिंचन प्रकल्प आदी परिसरात वृक्ष लागवड करण्यावर विशेष भर द्यावा. वृक्ष लागवडीत लोकसहभाग वाढविण्यासाठी ग्रामीण भागात, तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर वृक्षारोपणाबाबत जनजागृती करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. त्यानुसार वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, नगरपालिका, ग्रामपंचायतीमार्फत व्यापक स्वरुपात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली.

# तुकडाबंदी कायदा रद्द करण्याचा निर्णय स्वागतार्ह–डॉ.हुलगेश चलवादी

पुणे:–तुकडाबंदी कायदा रद्द करण्याची घोषणा राज्याच्या महसूल मंत्र्यांनी विधानसभेत केली.शहरी भागात गुंठ्यात जमीन खरेदी–विक्रीसाठी ७८ वर्षांपूर्वी केलेला हा कायदा डोकेदुखी ठरत होता. वर्षाच्या सुरुवातीलाच हा कायदा रद्द करण्याची मागणी बहुजन समाज पक्षाने केली होती.कायदा रद्द करण्याच्या दिशेने सरकारने टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे,असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्र्चिम महाराष्ट्र झोन प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.१०) केले.

राज्यातील जमीन खरेदी–विक्रीसंबंधीचे सरकारी धोरण आतापर्यंत बिल्डरांसाठी पोषक आणि गरीब; मध्यमर्गीयांसाठी मारक होते. सर्वसामान्यांना त्यांचे स्वप्नातील घर बांधता यावीत याकरिता शहर, उपनगरांमध्ये गुंठे खरेदी–विक्री नियमांत बदल काळाची गरज होती.केवळ विकासकांना लाभ पोहोचवणारी, त्यांच्या सदनिका विक्रीत वाढ करण्यासाठी विद्यमान प्रक्रिया कार्यान्वित होती, असा आरोप डॉ. चलवादी यांनी केला.



राज्यातील तब्बल ५० लाखांहून अधिक नारिकांना कायदा रद्द करण्यात आल्याने फायदा होईल.सरकारने १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार एक, दोन, तीन अशा गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्यावर निर्बंध घातले होते. परंतु, तीव्र विरोधानंतर यात सुधारणा करीत जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, तर बागायत जमिनीसाठी ११ गुंठे अशी मर्यादा ठरविली होती.मात्र, आता हा कायदाच रद्द करण्यात येणार असल्याने शहरी भागात १ गुंठा जमीन खरेदी–विक्रीची मुभा मिळेल,असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले.

सर्वसामान्यांची फसवणूकीतून सुटका होणार!

कुठलाही सर्वसामान्यान व्यक्ती ११ गुंठे जमीन खरेदी करून शकत नाही. गुंठे–दोन गुंठे जमीन घेवून ही मंडळी आपल्या स्वप्नातील घर बांधतात. पंरतु, तुकडाबंदी कायद्यामुळे खरेदी–विक्री व्यवहार सुरु असले तरी जमिनीचे तुकडे नियमित होत नव्हते. अशात 'पॉवर ऑफ अटर्नी' अथवा 'करारनामा' करीत जमीन खरेदी करण्याशिवाय कुठला पर्याय सर्वसामान्यांसमोर उरत नसत.या प्रक्रियेमुळे खरेदीदाराचे सात बाऱ्यावर नाव चढत नव्हते. जमिनदार याचा फायदा घेत एकच जमीन अनेकांना विक्री करीत त्याची फसवणूक करायचे.अशा प्रकारातून आता नागरिकांची सुटका होईल, असा विश्र्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.

## देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी 'जनसुरक्षा' विधेयक महत्त्वाचे

मुंबई : महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. संविधान विरोधी माओवादी चळवळ, नक्षलवाद्यांना प्रतिबंध करण्यासाठी हे विधेयक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हे विधेयक चर्चेअंती सभागृहाने बहुमताने मंजूर केले. या विधेयकावरील चर्चेदरम्यान सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उत्तर दिले. जनसुरक्षा विधेयकासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने सुचविलेल्या सूचनांचा अंतर्भाव करीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हे विधेयक विधानसभेत मांडले.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# सक्ती रद्द अधिवेशनापूर्तीच ?

## संपादकीय...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी शैक्षणीक त्रिभाषा सुत्रातील हिंदी सक्ती रद्द केली ती महाराष्ट्र विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन गोंधळमूक्त, संकटमूक्त व्हावे यासाठीच आणी राज्याची कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या साठीच केली तो सक्ती रद्दचा निर्णय हो सेना, मनसेच्या ठाकरे बंधूच्या ताकदमोर्चामुळे नाही असे स्पष्ट न सांगताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लांगूणचालन करण्यासाठीच भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यानी तसे स्पष्टीकरण केले असावे अशी उलटसूलट प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे. त्यामूळे हिंदी भाषा सक्ती प्राथमिक शाळेतील मूला, मूलीवर नाही आणी मराठीचा अभिमान आहे तीच मातृभाषा आहे यासाठीच तो निर्णय घेतला की ठाकरे सेना, मनसे बंधूची हवा काढून घेण्यासाठी केला यावर नव्याने वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

मुळातच हिंदी, मराठी, इंग्रजी ही त्रीसुत्रीभाषा मागील ठाकरे सरकारचाच निर्णय आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी ठणकावून सांगीतले असले तरी नक्कीच राज्याची कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी, नको तो वाद नकोच, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलाच आहे, हिंदीवरुन वाद करुन सामाजीक, भाषीक तेढ निर्माण होऊ नये म्हणून फडणवीस सरकारने जारी केलेले दोन्हीही जीआर रद्द केल्याची घोषणा केल्याने मराठीचा मोर्चा रद्द झाला पण विजयी सभा मात्र झाली. पून्हा भाईंदर मध्येही मोर्चा काढला गेला, पण सर्वकांही सुरळीत पण ताणातणावात सारे चालू असताना अचानक भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यानी हिंदी भाषा सक्तीचा हा निर्णय केवळ राज्य सरकारचे पावसाळी अधिवेशन निर्विघ्नपणे सुरळीतपणे पार पडावे यासाठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी हिंदी सक्तीचा निर्णय रद्द केला असे स्पष्ट करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उदारमनाचे, न्यायीक, पारदर्शक कर्तव्यदक्ष नेते असल्याची टीप्पणी रविंद्र चव्हाण यानी जोडल्याने चव्हाण हे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आहेत की, मुख्यमंत्री फडणवीस यांचे तूणतूणे असावेत अशी ही कुतूहलात्मक कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

वास्तवात कोणत्याही भाषेला विरोध नाही, तमाम शक्य त्या भाषा अवगत असल्याच पाहीजेत पंरतू बालवयात बालकावर भाषेचे ओझे नको म्हणून हा निर्णय घेतला गेला यात फडणवीस सरकारची पारदर्शक, दूरदृष्टी दिसते असे म्हणण्याऐवजी चक्क पावसाळी अधिवेशन सुरळीत चालावे, गोंधळ, भोंगळेपणा दिसू नये त्यासाठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी हिंदी सक्तीचा निर्णय तात्पुरता रद्द केला असेच चव्हाण याना म्हणायचे असेल की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तूणतूणे वाजवून त्याना मंत्रीपद मिळवायचे आहे किंवा अधिवेशनपूर्तीसाठीच हिंदी सक्ती निर्णय रद्द केला असे स्पष्ट करुन देवेंद्रजी फडणवीस याना अडचणीत आणण्याचा मनसुबा भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण याचा असावा असाही तर्कवितर्क काढला जातो आहे.

## लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

आज ११ जुलै आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दीन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो.

१९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. दोन वर्षापूर्वीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. दोन वर्षापूर्वीच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे.

भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत.

विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे.

अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे.

लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# श्रध्दा व निष्ठा वृध्दिंगतासाठी वर्षावास !

चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकम्पाय, अत्थाय हिताय देवमनुस्सानं ।
देसेथ भिक्खवे धम्मं, अदिकल्याणं मज्झकल्याणं, परियोसानकल्याण, सात्थ सब्यञ्जनं ब्रम्हचरियं पकासेथ्।।



तथागतांनी धम्म प्रचार व प्रसारासाठी भिक्खूंना आदेश दिला. भिख्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा, प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्म मार्गाचा लोकांना उपदेश करा. वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास आषाढी पौर्णिमेपासून आश्रिवन पौर्णिमेपर्यंत, या तीन महिन्यात फक्त बुद्ध विहारात जीवन व्यतीत करणे. या काळात भिक्खूंनी धम्म-प्रचार-प्रसारासाठी स्वत:ला तयार करणे, बौध्द उपासक/ उपासिकांना धम्माचं महत्व सांगणे, ध्यान-साधना करणे, धम्मदान स्विकारणे आदि नित्यक्रम करावे असा आदेश तथागतांनी भिक्षूसंघास दिला. त्याप्रमाणे ते आचरण करीत असत. यालाच वर्षावास म्हणण्याची प्रथा सुरु झाली, ती आजतागायत अविरत सुरु आहे यात खंड नाही. इथेच वर्षावासाचं महत्व सर्वश्रुत आहे. तथागतांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर पंचवर्गीय संन्याशांना आपला अष्टांगिक मार्ग, प्रतीत्य समुत्पाद, चार आर्यसत्य हे समजावून दिल्यानंतर त्यांना ते कळले. इसिपतन वन (आधुनिक सारनाथ), वाराणसी येथे अनुत्तर असे पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आश्रिवन पौर्णिमेला एकसष्ठ अर्हत भिक्षुंच्या समवेत धम्मचक्राची घोषणा केली. चारही दिशांना जाऊन बहुजन हिताय - बहुजन सुखाय धम्माची अशी सिंहगर्जना केली.

तथागत बुध्दांची पहिली धम्मसभा आषाढी पौर्णिमेला झाली. पुढे भिख्खूसंघाच्या निर्मीतीनंतर दरवर्षी याच कालावधीत उपासक वर्षावास करतात. याची सुरुवात आषाढी पौर्णिमेला होते आणि याच काळात पंढरीची वारी ही सुरु होते, हे निव्वळ योगायोग नाही. भगवान बुद्धाच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्षूंना धम्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिख्खू या कामात गुंतले होते, परंतु असे केल्याने त्यांना बऱ्याच संकटांना आणि विशेषतः पावसाळ्यात नद्यांमध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागे. पुरामुळे बौद्ध भिख्खू वाहून जात आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान होत त्यांनी हे तथागतांना सांगितले, बुद्धांनी आदेश दिला की आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत सर्व भिक्षूंनी एकाच ठिकाणी रहावे, भिक्षेसाठी गावात जाऊ नये. एकाच ठिकाणी राहून धम्माचे पठण अध्ययन करावे. जर गरज पडली तर भिक्षू आपल्या गुरूंकडून जास्तीत जास्त एका आठवड्याचा वेळ घेऊन विहारातून बाहेर जाऊ शकतात, भगवान बुद्ध काळापासून वर्षावास अस्तित्वात आहे. तथागतांनी ४५ वर्षावास श्रावस्ती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी केले. अशा प्राचीन गुरू-शिष्य परंपरेचे पालन आजही भारतात आणि बौद्धराष्ट्र थायलंड, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि बांगलादेश पालन करतात.

आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरू होतो आणि अश्रिवन पौर्णिमेला संपन्न होतो, बौध्द धम्मात वर्षावासाला अनन्य साधारण महत्व आहे, सर्व बौध्द उपासक उपासिकांनी या तीन महिन्याच्या कालावधीत स्वःताच्या घरी रोज बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या बुध्द आणि त्यांचा धम्म या पुस्तकाचे किंवा अन्य बुद्ध धम्माशी संबंधित पुस्तकाचे रोज सामुहिक वाचन करून त्यावर मनन चिंतन करावे व त्याचे आपल्या जिवनात अनुकरण केले पाहिजे, नियमितपणे शेजारच्या बुध्दविहारात जावून धम्म श्रवण करावा व धम्ममार्गावर आरूढ व्हावे, धम्मदान द्यावे, उपोसथ व्रत घेऊन अष्टशिलाचे पालन करून सद्गुणाचा पाया मजबूत करावा, आपल्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबास यानुसार आचरण करण्यास प्रोत्साहित केल्यास बौध्द उपासकांचा मोठा संघ तयार होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या प्रबुध्द भारताचे दिव्य स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल.

बुद्धांनी शिकवले की उपोसथ दिवस म्हणजे अशुद्ध मनाची शुद्धता करण्याचा दिवस होय, उपोसथ किंवा उपोस्थ या शब्दाचा अर्थ उप+स्था म्हणजे एकत्र बसणे होय, भिक्षुसंघाची एकसंघपणा टिकवून राहण्यासाठी उपोसथ विधी खूप महत्त्वाचा मानला गेला. उपोसथ विधी बुद्ध काळापासून अस्तित्वात आहे आणि बौद्ध देशांमध्ये उपोसथ विधी श्रद्धापूर्वक पाळला जातो. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी भिख्खू पटिमोक्खा (आचारसंहितेचे नियम) यांचे पाक्षिक कबुलीजबाब आणि पाठ होते. या दिवशी बौद्ध उपासक आणि भन्ते धम्म अध्ययन आणि ध्यानाची तीव्रता आणखीन वाढवतात. विनयासंबधी जर आचारात काही दोष आला असेल तर उपोसथ दिनी भन्ते सर्वांसमोर कबुलीजबाब देत असत व संघ नियमानुसार त्यांना पुढील कारवाईस समोर जावे लागत. हा विधी खूप पवित्र मानला जाई, आजही त्याचे पालन केले जाते.

धम्माप्रती वचनबद्ध उपासक गृहस्थ पंचशील, दहा परिमिता, अष्टांगिक मार्गाचे पालन करतात धम्म आचरणात उत्साह जागृत होण्याकरिता समाधी मार्गाचे, ध्यानाचे अवलंबन करतात. जेव्हा शक्य असेल तेव्हा उपासक या दिवसाचा उपयोग स्थानिक विहारात जाण्याची संधी म्हणून करतात. या दिनी संघाला विशेष दान अर्पण केले जाते, धम्म प्रवचन ऐकले जाते आणि रात्री उशिरापर्यंत धम्म बांधवा सोबत ध्यान-धारणा केली जाते. जे उपासक विहारात जाऊ शकत नाहीत अशांना ही उपोसथ दिन संधी देतो कि, आपले ध्यान करण्याचे प्रयत्न वाढवावे कारण या पवित्र दिनी जगातील हजारो उपासक ध्यान धारणेचा अभ्यासात वुद्धी होण्याच्या दिशेने पाऊल टाकतात.

तथागत बुद्धांच्या आदेशानुसार भिक्खुसंघ धम्म प्रचारासाठी सर्व ऋतूत चारही दिशांना पायी फिरत असत, या तिन्ही ऋतुत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे, नैसर्गिक संकटांचा सामना करून प्रतिकूल परिस्थितीतही ते धम्माचा प्रचार-प्रसार करीत असत. हे सर्व लक्षात घेऊन तथागत बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्रिवन पौर्णिमा या कालावधीत, एकाच ठिकाणी विहारात राहून धम्माचा अधिक अभ्यास करीत आसपासच्या परिसरातील उपासकांना धम्मज्ञान देण्याबाबत सूचना दिल्या, आषाढ पौर्णिमा ते अश्रिवन पौर्णिमा हा काळ वर्षावास म्हणुन तेव्हापासुन संपन्न होऊ लागला (वर्षावास म्हणजे पावसाळयातील निवास) वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म-श्रवण करतात, विहारात भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करतात व आजही सातत्याने सुरु असतात. फार महत्व आहे या पोर्णिमेचेआपण आपली संस्कृती जपली पाहिजे. आषाढ पौर्णिमेच्या अर्थात गुरु पौर्णिमेच्या सर्व उपासक/ उपासिकांना मंगलमय शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्यासाठी संबंधित विभागांची एकत्रित बैठक घेऊ - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

मुंबई : ऊसतोड महिलांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी सामाजिक न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि सहकार विभाग यांची एकत्रित बैठक घेऊन उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन होत असल्याबाबत पाहणी केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत दिली.



बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भाशय पिशवी काढण्यात येत असल्याची बाब विधान परिषद सदस्य उमा खापरे यांनी मांडली, त्यावर मंत्री श्री.पाटील यांनी माहिती दिली. यात सदस्य श्रीमती चित्रा वाघ, डॉ.मनीषा कायंदे यांनीही प्रश्न उपस्थित केले.

मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, ऊसतोड मजूर महिलांसंदर्भातील हा विषय सार्वजनिक आरोग्य, महिला बालविकास, कामगार, सामाजिक न्याय विभाग यांच्याशी निगडित आहे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ऊसतोड मजूर महिलांची हंगाम सुरू होण्यापूर्वी आणि हंगाम सुरू झाल्यानंतर दोन वेळा तपासणी होते. त्याचप्रमाणे गर्भाशय पिशवी काढण्यापूर्वी जिल्ह्या शल्य चिकित्सक यांची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी सांगितले.

ऊसतोड मजूर महिला कामगारांसाठी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून या समितीच्या नियमित बैठका होत असल्याचे सांगून सहकार मंत्री श्री.पाटील म्हणाले की, आजदेखील या समितीची बैठक झाली आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार मंडळाने अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. उच्च न्यायालयाने पाच महिन्यांपेक्षा जास्त काळ गर्भवती असलेल्या महिलांना ऊसतोडीचे काम देऊ नये, असे सक्त निर्देश दिलेले आहेत. या निर्देशाची कार्यवाही करतांना ऊसतोड महिलांचा बुडालेला रोजगार विचारात घेऊन त्या महिलांसाठी योजना सुरू करता येईल, करण्यासंदर्भात देखील विशेष प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

## झरोका

एक - सरकारी आरोग्य यंत्रणा एवढी कर्तव्यदक्ष आणी समयसुचक, निरोगी बनली आहे याचा आणी देवेंद्र फडणवीस सरकारचा सार्थ अभिमान वाटतो पण याच आरोग्य यंत्रणेत गाढवाला धूण्याची लायकी नसलेले डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी बसलेत, कार्यरत आहेत याची लाज वाटते. दोष कोणाला द्यावा हेच कळत नाही, डोकं सैराट बनते आहे.

दुसरा - अरे, ये सैराट बनणाऱ्या भन्नाट माणसां काय झालं, आरोग्य विभागात काय चांगल, विपरित घडलं की नाय, ते तरी सांगशील काय ? की उगीच बरळत राहतोस.

एक - अहो, अंबाजोगाई येथील स्वामीरामानंद तिर्थ रुग्णालयात होळ येथील एक महिला प्रसूतीसाठी दाखल झाली, तिला बाळ झाले पण वेळेपूर्वीच प्रसुती झाल्याने बाळ कमी वजनाचे होते, ते निपचित पडले होते. डॉक्टरानी गांभीर्यपूर्वक तपासणी केली पाहीजे, इतरांचा सल्ला घेतला पाहीजे पण नाही त्या डॉक्टराचा चौकसपणा भारी त्याने बाळाला मृत घोषीत केले, बाळांतणीला घेवून त्या मृत बाळासह नातेवाईक होळकडे रवाना झाले. एका महिलेने त्या मृत म्हणविणाऱ्या बाळास कूशीत घेतले तेंव्हा ते हालचाल करीत होते, कूशीची उब लागताच ते रडू लागले. आणी अंत्यसंस्कार रोखला गेला. त्या बालकावर उपचार सुरु आहेत मग अशा डॉक्टरबद्दल काय बोलावे हेच कळत नाही म्हणून बोलतो आहे.

दुसरा - अरे, वैद्यकीय क्षेत्रच काय, केंद्र-राज्य सरकारातील मंत्री, आमदार ही अतिशहाणे, बिनडोक पण तत्पर, सत्तापिपासू आहेत म्हणूनच कर्तव्यदक्ष, पारदर्शक कारभारी म्हणून बसलेत. इथं माणसांची, मतदाराची किमंत नाही तर मग अर्भक बाळाची काय किमंत असणार ?

## काय बोलता राव ?

बेचव जेवण असल्याचे कारण पुढे करुन आमदार निवासातील कॅटीन कर्मचाऱ्यास आ. संजय गायकवाड यानी मारहान केली. तो त्यांचा नेहमीचाच धंदा, राडा असतो. ते नेहमीच वादग्रस्त विधाने करीत असतात, स्वातंत्र्यविर सावरकर, यांच्यावरील विधानावरुन खा. राहूल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास अकरा लाखाचे बक्षीस जाहीर केले होते. हिंदीवरुन निर्माण झालेल्या पेचावरुन संभाजीराजे १६ भाषा शिकले होते वगैरे असे विधान ते करतातच. त्यामूळे शिंदेसेनेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिले असले तरी शिंदेसेना आ. संजय गायकवाड यांची गुर्मी आहे तशीच आहे, असे सर्वत्र बोलले जात आहे.

### काय बोलता राव !

अरे, शिंदे सरकार मध्ये आणी आता फडणवीस सरकार मध्ये ही मंत्री, आमदार पैकी अनेकजन असे विधान करुन प्रसिध्दी मिळवित असतात. कारण निधी मागीतला, विकास करा, नोकऱ्या द्या, महागाई, अन्याय, अत्याचार, बलात्कार थांबवा असा सुर उमटला की त्यासाठी त्याना वेळ नसतो पण जेवण बेचव झाले तर कर्मचाऱ्याला मारहान करण्यासाठी वेळ असतो, रस्ते, पूल बांधण्यासाठीच्या उद्‌घाटनास सत्ताधाऱ्याना वेळ नसतो पण रस्ते खराब झाले, पूल पडले, दुर्घटना घडली तरी भेट देणे, दुरुस्ती करण्यास वेळ नसल्याने जेवण्यासाठी मारहाण करणाऱ्या सदस्याचे हे मंत्री मंडळ असल्याने पून्हा कोणी न्याय, हक्क मागीतला तर त्या मागण्याच चूकीच्या म्हणून मार खावा लागेल सावध, राहा, मग बोला दाजीबा !



### गुरुवर्य ..

सर्व व्यापी सद्गुरू
कामे जमतात सारी
पडेल ते सगळे करा
नाही बोलायचे सॉरी

मोजावी खानेसुमारी
हिंडत रहा घरो घरी
लसीकरण केले का
पहात रहा दारो दारी

बडदास्त ठेवा मस्त
येता शिक्षणाधिकारी
सज्ज रहा सेवे साठी
चहा बिस्कुटे न् खारी

वृक्षारोपण यंदा मोठे
हातात शोभते झारी
इलेक्शन ड्युटी वरी
मधेच निघाली स्वारी

कुटूंबनियोजन किती
मोजायचीहागणदारी
कोण जाणे सांगतीलं
करावी वसुल उधारी

सकाळी बनव न्याहरी
खिचडी पकवा दुपारी
म्हणू नका नाचा रात्री
घेऊन झकास सुपारी

मुले शिकती आपसूक
ती स्वावलंबी बिचारी
का वाढे नापासप्रमाण
रे शिक्षका प्रश्न् विचारी

### सार्थ गुरू ..

स्वदेशी पुज्य राजा
विद्वानसर्वत्र पुज्यते
पुनश्र्च जाणीव होते
गुरूपौर्णिमा निमित्ते

गुरू शिष्य परंपरेने
सुवर्ण नाते उजळते
जागृती उषःकालास
काळोख रात जळते

अलौकिकबंधन सूत्र
अस्तित्वसार्थ कळते
अडखळतील पावूले
सुयोग्य वाटेस वळते

खुलते ज्ञानभांडार ते
मनोवांच्छीत मिळते
गुरू चरण कमलावर
नजर झुकून खिळते

मातापिता बंधू सखा
रुपे कैक झळझळते
अनुभव शिक्षकखरा
जाणे भाग्य उजळते

शिष्य परिपूर्ण होता
गुरूत्व महत्व कळते
कळला शिक्षक जया
करद्वय सहज जुळते

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

## लातूर शहरातील तुळजाभवानी नगरचा रस्ता वाढवणाऱ्या वादग्रस्त रेखांकनास स्थगिती देऊन चौकशी करा

मुंबई (प्रतिनिधी) : लातूर महापालिका हद्दीतील तुळजाभवानी नगरमधील नागरिकांचा मुख्य रस्त्याकडे जाण्याचा मार्ग अडवणाऱ्या आणि सर्व नियम डावलून चुकीच्या पद्धतीने मंजूर केलेल्या रेखांकनास त्वरित स्थगिती देण्यात यावी, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत केली.

या गंभीर प्रकारणाच्या संदर्भाने माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्यासह सर्व संबंधितांची मंत्रालयात बैठक घेण्यात येईल, संपूर्ण प्रकरण तपासून यात काही चुकीचे निर्दशनास आलयास ताबडतोब दोषी असणाऱ्यावर कारवाई करण्यात येइल. त्याच बरोबर रेखांकनात झालेल्या चुका दुरुस्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे आश्र्वासन राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विषयावर बोलतांना दिले आहे.

# प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या २३ व्या पुस्तकाचे विमोचन

लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या ' एनईपी–२०२० बी.एस्सी.द्वितीय वर्षाच्या रियल नालिसिस ' या पुस्तकाचे विमोचन नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ.अशोक महाजन व दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी आणि इतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दि.०८ जुलै २०२५ रोजी दयानंद सभागृहात झाले.याप्रसंगी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत बावीस्कर,सिनेट सदस्य डॉ.ए.टी.शिंदे,डॉ.दीपक बचेवार,दयानंद शिक्षण संस्था शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड, स्पोर्टस् डायरेक्टर डॉ.भास्कर माने,डॉ.एम.एस.वावरे यांची प्रमुख उपस्थिती होती.




प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या टारगेट पब्लिकेशन मुंबईद्वारे प्रकाशित झालेल्या ' परफेक्ट मॅथेमॅटिक्स ' या पुस्तकाचे वर्ष २००९–१० यावर्षी विक्रमी दोन लाख ६५ हजार प्रती वाचकांनी विकत घेतलेल्या आहेत.आजपर्यंत त्यांचे विविध बावीस पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.बालाघाट मॅथेमॅटिकल सायन्सेस सोसायटी आणि दयानंद विज्ञान महाविद्यालयातील गणित विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मॅथेमॅटिकल नालिसिस नावाचे जर्नलसुद्धा प्रकाशित होते. आत्तापर्यंत त्या जर्नलच्या सात एडिशन प्रकाशित झालेल्या आहेत.तसेच त्यांचे संशोधनातील प्रकाशनही उत्कृष्ट दर्जाचे आहे.त्यांनी आजपर्यंत ८९ शोधनिबंध पेपर प्रकाशित केलेले आहेत.

प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांचा एकूण २५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असून या महाविद्यालयात १० वर्षापासून आयक्यूएसी,नॅक इ.महत्त्वाच्या पदावर समन्वयक म्हणून कार्य केलेले आहे. त्यांच्या या कार्य हातभारामुळे महाविद्यालयास आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरीय १८ पुरस्कारही मिळालेले आहेत.यूएसए, रोमानिया,दक्षिण कोरिया, थायलंड, ओमान, स्वित्झर्लंड फ्रान्स,सिंगापूर,मलेशिया इत्यादी देशात त्यांनी निमंत्रित चर्चेसाठी परदेशात भेटीही दिल्या आहेत.त्यासाठी त्यांना ूजीसी,सीएसआयआर,एसईआरबी इ.विभागाचेही अनुदान प्राप्त झाले आहे.डॉ.बेल्लाळे हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणित मंडळावर पदाधिकारी म्हणून कार्य करतात. त्यांनी ०२ आंतरराष्ट्रीय परिषद,०६ राष्ट्रीय परिषद,०९ राज्य,विद्यापीठ स्तरावरील परिषदाही महाविद्यालयात घेतल्या आहेत.त्यांच्या मार्गदर्शनाखाली एम.फिल. व पीएच. डी.चे विद्यार्थीही संशोधन करीत आहेत.त्यांना एकूण विविध क्षेत्रातील ०९ आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.त्यांनी एकूण १४ अभ्यासक्रमांचे डिझाईन केले असून त्यांचे एकूण ११४७ ऑनलाईन युट्यूब व्हिडिओ लेक्चर्स राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी युट्यूबवर उपलब्ध आहेत .त्या व्हिडिओ लेक्चर्सला ३.७ मिलीयन मिनिटे व्हियुज प्राप्त आहेत.त्यांच्या २३ व्या पुस्तकाचे विमोचन झाल्याबद्दल महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# सावधान!लोकसंख्या अशीच वाढत राहिली तर निसर्गाचा ह्रास आणि लोकसख्या वाढीचा त्रास सर्वांनाच भोगावा लागेल.

लोकसंख्या अशीच वाढत राहाली तर निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रासजगातील प्रत्येक व्यक्तीला,संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल.वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे.

लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले.ही बातमी जगभर पसरली.त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येवु लागले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (युएनडीपी)गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली.

या शिफारशी नुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती.यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले.यानंतर आफ्रिका, युरोप,उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पध्दतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता.भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती.ती आजच्या घडीला १४० कोटीच्यावर गेली आहे.हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

२०१४ च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक लोकसंख्या असनारे देश याप्रमाणे प्रथम चीन,भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान,ब्राझील,नायजेरिया,बांगलादेश,रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात.हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भुभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भुभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून सर्वच मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे.त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष–विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा. वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परीस्थितीशी सामना करावा लागत आहे.

यामुळे बेरोजगारी,भुकमरी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणी टंचाई, इंधन,आरोग्य विषयक सुविधांचा अभाव,औषधांची समस्या, मुलभूत सुविधांचा अभाव इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.त्याचप्रमाणे औद्योगिकीकरण व उद्योग धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या रहाण्याच्या व्यवस्थेकरीता



मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे.त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे धाव घेतांना दिसतात.भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पहाता आता भारत सरकारने एक परीवार एकच अपत्य असा कायदा सर्वांसाठी अमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो.

यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल व देशाचा विकास होईल.अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहाली तर मानुस मानसाला मारल्या शिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात.

भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की अनेक लोक फुटपाथवर झोपतांना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाच्या जवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे.आज जगाला लोकसंख्या वाढी पेक्षा वृक्ष वाढवीण्याची नितांत गरज आहे.कारण वृक्ष तोडीमुळे सुर्य आग ओकत आहे.आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे. त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे. निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे.याला कोठेतरी रोखले पाहिजे.मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी सुखसमाधानासाठी लोकसंख्या वाढवीली आहे. त्यामुळे आज हिंसक प्राणी मानवावर आक्रमण करताना दिसतात यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे. ही परीस्थिती मानवाने स्वत:हुन ओढावली आहे.

मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसत आहे.त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहेच सोबतच पाण्याचे उष्णतामान सुध्दा वाढत आहे.म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भुभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते.कोव्हिड–१९ महामारी ही सुध्दा मानवाच्या अतीरेकाचे कारण आहे.चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात.त्यामुळे चीन विस्तारवादाचे घृनीत कृत्य करतांना दिसतो.हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवलेला आहे.चीनच्या विस्तारवादाच्या भुमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की मानव एक–मेकावर बंदुक ताणुन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसला आहे.यावरून स्पष्ट होते की लोकसंख्या वाढीमुळे जग भुईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे असे मी समजतो. आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ,कार्बाइडने पिकवीलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तुचा वापर लोकांना करावा लागतो.यामुळे घातक आजार सुध्दा होवु शकतात आणि होत आहे.यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे.याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलन्याची नितांत गरज आहे.जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार वाढती लोकसंख्याच आहे.लोकांच्या सुखसुविधांकरीता विमान वाहातुक,रोड वाहातुक,रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावतांना दीसतात यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचा परीनाम असा होत आहे की अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे.

त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारनी वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत.काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढवीण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.मानवाच्या बुध्दीजीपनामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशु–पक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढेचालुन अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल हेही तेवढेच सत्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या अशीच झपाट्याने वाढत रहाली तर कोणतेही सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही.त्यामुळे आताच सावधगिरीचे उपाय योजले पाहिजेत व लोकसंख्येवर नियंत्रण आनले पाहिजे.

लोकसंख्यावाढीमुळे भारतासह जगात केव्हाही महाप्रलय येवु शकतो हे सरकारने व जनतेने लक्षात ठेवले पाहिजे.जगातील लोकसंख्या अशाच वेगवान गतीने वाढत रहाली तर मानवाच्या उष्णतेमुळे आणि अतीरेकामुळे शिखरातील बर्फ आपोआप वितळायला सुरूवात होईल व समुद्राची पातळी आपोआप वाढत जाईल याला नाकारता येत नाही.त्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत सावधान होने गरजेचे आहे.केंद्र सरकार, राज्य सरकार व पक्ष–विपक्षाचे राजकीय पुढारी यांना आग्रह करतो की लोकसंख्या नियंत्रणासाठी सर्वोतोपरी कठोर पाऊल उचलण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जगातील प्रत्येक देशांनी आजच्या घडीला वृक्षारोपण करून करोडो झाडे लावण्याचा संकल्प करावा.

लेखक
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## इतिहासात आजचा दिवस ११ जून २०२५

अंतरराष्ट्रीय

१३४६ – लक्झेम्बर्गचा चार्ल्स पाचवा पवित्र रोमन स्म्राटपदी.

१४०५ – चीनचा झ्हेंग हे जहाजांचा तांडा घेउन जग धुंडाळायला निघाला.

१५७६ – मार्टिन फ्रोबिशरला लांबून ग्रीनलँडचा किनारा दिसला.

१७५० – कॅनडातील हॅलिफॅक्सशहर आगीत भस्मसात.

१८०४ – अमेरिकेच्या उपराष्ट्रपती एरन बरने अर्थमंत्री अलेक्झांडर हॅमिल्टनला द्वंद्वयुद्धात ठार केले.

१८११ – इटलीच्या आमादिओ ऍव्होगाड्रोने आपला वायुच्या अणुरचनेचा सिद्धांत प्रकाशित केला.

१८५९ – चार्ल्स डिकन्सची ए टेल ऑफ टू सिटीज ही कादंबरी प्रकाशित.

१८८९ – मेक्सिकोतील तिहुआना शहराची स्थापना.

१९१९ – नेदरलँडमध्ये कामगारांकडून एका दिवसात जास्तीत जास्त आठ तासांचे काम घ्यायचा व रविवारी सुट्टी देण्याचा कायदा लागू झाला.

१९२१ – मंगोलियाला चीनपासून स्वातंत्र्य.

१९४० – हेन्री फिलिप पेटैं विची फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

१९५५ – अमेरिकेने आपल्या चलनावर इन गॉड वी ट्रस्ट (देवावर आमचा विश्वास आहे) असे मुद्रित करण्याचे ठरवले.

१९५७ – करीम हुसेनी आगाखान इस्माइलीपंथाच्या प्रम ुखपदी.

१९६० – हार्पर लीची टु किल ए मॉकिंगबर्ड ही कादंबरी प्रकाशित.

१९७१ – चिलीने तांब्याच्या खाणींचे राष्ट्रीयीकरण केले.

१९७३ – ब्राझिलचे बोईंग ७०७ प्रकारचे विमान पॅरिस ओर्लि विमानतळावर कोसळले. १३४ पैकी १२३ प्रवासी ठार.

१९७५ – चीनमध्ये ई.स.पू. तिसऱ्या शतकातील चीनी मातीच्या ६,००० मुर्ती असलेली दफनभूमी सापडली.

१९७८ – स्पेनमध्ये प्रवाहीकृत वायू घेउन चाललेल्या ट्रकला अपघात. २१६ ठार.

१९७९ – अमेरिकेचे अंतराळस्थानक स्कायलॅब पृथ्वीवर कोसळले.

१९८२ – फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात इटलीने पश्चिम जर्मनीला ३–१ असे पराभूत केले.

१९८३ – इक्केडोरमध्ये बोईंग ७२७ प्रकारचे विमान कोसळले. ११९ प्रवासी ठार.

१९९१ – नायजेरिन एरवेझने भाड्याने घेतलेले नेशनएरचे डी.सी.८ प्रकारचे विमान जेद्दा येथे कोसळले. २६१ प्रवासी ठार.

१९९५ – अमेरिका व व्हियेतनाममध्ये राजनैतिक संबंध पुन–प्रस्थापित.

१९९५ – स्रेब्रेनिकाची कत्तल – युगोस्लाव्हिया व बॉस्नियाच्या सैन्याने स्रेब्रेनिका शहर काबीज केले व ८,००० व्यक्तींना ठार मारले.

१९९५ – क्युबाना दि एव्हिएशनचे ए.एन.२४ प्रकारचे विम ान कॅरिबियन समुद्रात कोसळले. ४४ ठार.

२००४ – सी.आय.ए.च्या निदेशक जॉर्ज टेनेटने राजीनामा दिला.

२००६ – उत्तर बांग्लादेशात एका रेल्वे क्रॉसिंगवर रेल्वे आणि बसच्या अपघातात २० जण ठार झाले.

राष्ट्रीय

२००३ – १८ महिने बंद असलेली लाहोर–दिल्ली बस सेवा पुन– सुरू.

२००६ – मुंबईत उपनगरी रेल्वे गाड्यांमध्ये स्फोट. १०० हून अधिक ठार.

२००७ – दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलाने केलेल्या कारवाईत २० नक्षलवादी ठार झाले तर या कारवाईसाठी गेलेल्या पथकातील २४ सुरक्षारक्षकही ठार झाले.

जन्म

१२७४ – रॉबर्ट द ब्रुस, स्कॉटलंडचा राजा.

१६५७ – फ्रेडरिक पहिला, प्रशियाचा राजा.

१७६७ – जॉन क्विन्सी ऍडम्स, अमेरिकेचा ६वा राष्ट्राध्यक्ष.

१८९० – नारायण हरी आपटे, जुन्या काळातील प्रसिद्ध कादंबरीकार.

१९१६ – गॉफ व्हिटलॅम, ऑस्ट्रेलियाचा २१वा पंतप्रधान.

१९३० – जॅक अलाबास्टर, न्यू झीलँडचा क्रिकेट खेळाडू.

१९५० – जिम हिग्स, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

निधन

०४७२ – अँथेमियस, पश्चिम रोमन स्म्राट.

०९३७ – रुडॉल्फ दुसरा, बरगंडीचा राजा.

११७४ – अमाल्रिक, जेरुसलेमचा राजा.

१६८८ – नराई, सयामचा राजा.

१८०४ – अलेक्झांडर हॅमिल्टन, अमेरिकेचा अर्थमंत्री.

१९५९ – चार्ली पार्कर, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.

१९६७ – राजपूत घराण्यातील प्रसिद्ध वीर मिर्झाराजे जयसिंग.

१९८९ – सर लॉरेंस ऑलिव्हिये, ब्रिटीश अभिनेता.

१९९४ – भारतातील पहिले परमवीरचक्र विजेते मेजर रामा राघोबा राणे.

२००६ – खासदार वसंत चव्हाण, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते.

प्रतिवार्षीक पालन

जागतिक लोकसंख्या दिन – संयुक्त राष्ट्रे.

नाडम – मंगोलिया.

राष्ट्रीय समुद्री दिन – चीन.

## निलंगा ते उदगीर मार्गावर मंजूर बस फेऱ्यासोबत शिवशाही बसच्या जादा फेऱ्या

लातूर, (जिमाका) : निलंगा ते उदगीर या मार्गावर निलंगा आगाराच्या ८ बसेस मंजूर असून संपूर्ण नियमितपणे सुरू आहेत. या बसेसच्या दर अर्धा तासाला एक याप्रमाणे जाणाऱ्या २४ व येणाऱ्या २४ अशा फेऱ्या चालतात. तसेच त्या व्यतिरिक्त



या मागार्वर उदगीर–निलंगा–सोलापूर, उदगीर–शहाजनी औराद २ फेऱ्या, देगलूर–पंढरपूर असे दैनंदिन बसेस चालतात. या व्यतिरिक्त प्रवाशी गर्दी पाहून उदगीर ते निलंगा मार्गावर उदगीर आगारामार्फत शिवशाही बसचे ४ ज्यादा बसेस चालू करण्यात आल्या आहेत. या बसेस स्वच्छ व तांत्रिक दोष नसलेल्या आहेत.

शिवशाही बसेसच्या एकूण २४ फेऱ्या चालत असून त्याचे दैनंदिन किलोमीटर १ हजार ५८९ इतके आहेत. शिवशाही बसेसमध्येही ज्येष्ठ नागरिक यांना ५० टक्के, अमृत ज्येष्ठ नागरिक यांना १०० टक्के व महिला सन्मान योजनेतंर्गत महिलांना ५० टक्के सवलत लागू आहे. या मार्गावर धावणाऱ्या शिवशाही जादा बसेस स्वच्छ व तांत्रिक दोष नसल्याबाबतची पडताळणी करुनच मार्गावर पाठविण्यात येत आहेत, असे राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी कळविले आहे.

# (गुरु वचन) वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा.

असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

# उपदेशकथा

समुद्रकाठी एक टुमदार शहर होते. तेथे पौर्णिमेचा चंद्र उदयास आला. त्याचे सौंदर्य काय वर्णन करावे ! पण त्याच्याकडे पाहून त्या शहरातील कुत्र्यांना काही चैन पडेना. सारे कुत्रे चंद्राकडे पाहून मोठमोठ्याने भुंकायला लागले. अर्थात त्यामुळे शहरातील शांतता भंग पावली. कुत्र्यांमध्ये एक शहाणा कुत्रा होता. तो आतापर्यंत गप्प होता. इतर कुत्रे जेव्हा भुंकणे थांबवितात तेव्हा तो त्यांना म्हणाला, ''अरे, तुमचे भुंकणे काही चंद्रापर्यंत पोचणार नाही आणि उगीच पृथ्वीवरील शांतता मात्र भंगणार. म्हणून गप्प बसा ना.'' सर्व कुत्रे भुंकण्याचे थांबले पण भुंकू नका असा उपदेश करणारा कुत्रा मात्र शांततेसाठी रात्रभर भुंकत होता.

कथा उपदेश : स्वत:ला शहाणे समजून लोक असाच उपदेश करीत असतात.

# त्यांच्या वाणीतून----

आरोग्य विभागाच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात लोकसंख्यानिहाय आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. नागरी क्षेत्रातील आरोग्य प्रकल्पांच्या कामांसाठी प्रत्येक पालक सचिवांनी नियोजनबध्द कार्यक्रम आखून या कामांना गती द्यावी. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देवून 'आपले सरकार' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**- मुरव्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यात सध्या जळगाव आणि नांदेड जिल्ह्यात केळी संशोधन केंद्र अस्तित्वात आहे. सोलापूर जिल्ह्याच्या करमाळा तालुक्यातील शेलगाव येथे केळी संशोधन केंद्र सुरू करण्याबाबत मागणी आहे. नवीन केंद्र स्थापन न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तथापि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत चर्चा करून या मागणीबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल.

**— कृषी मंत्री माणिकराव कोकाटे-**

ऊसतोड महिलांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी सामाजिक न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि सहकार विभाग यांची एकत्रित बैठक घेऊन उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन होत असल्याबाबत पाहणी केली जाईल.

**- सहकार मंत्री बाबासाहेब पाटील**

# राशिभविष्य ११ जुलै २०२५

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व

आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण

प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

मिथुन:शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम

जीवनसाथीच्या व्यवहारात सुधारणा होईल. केलेल्या कामाचे चांगले फळ मिळेल. निर्णय घेण्यासाठी विलंब करू नका. व्यापार चांगला चालेल. पत्र मिळेल.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पुर्व

चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

सिंह : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम

महत्वपूर्ण गोष्टींचा विचार कराल. आळस सोडून देऊन सक्रीय व्हावे लागेल. भेट वस्तू मिळेल. कुटुंबात कोणाशीतरी मतभेद होण्याची शक्यता.

कन्या : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: दक्षिण

कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

तुळ : शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर

फायद्याच्या मार्गात विस्तार होईल. ध्येय समोर ठेवून काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती उत्तम राहील. आरोग्याची तक्रार राहण्याची शक्यता.

वृश्चिक :शुभ रंग:निळा,शुभ दिशा:पश्चिम

सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

धनु : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम

कलेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. नौकरीत बढती किंवा बदलीचे योग आहेत. अधिक फायदा झाल्याने बचतीच शक्यता.

मकर : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पुर्व

आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

कुंभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर

आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

मीन : शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम

सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

# थंड आणि गरम असं मिक्स पाणी का पिऊ नये? कारण समजल्यावर 'ही' चुक कधीच करणार नाही?



तुमच्यासोबत असंही होतं का की तुम्ही फ्रीजमधून पिण्यासाठी पाणी काढता आणि ते खूप थंड झाल्यावर त्यात गरम पाणी मि सळता? हे अगदी साम ान्य आहे. सामान्यपणे लोक असं करतात पण हेल्थ एक्सपर्टच्या म्हणण्यानुसार, हे शरीरासाठी खूप घातक आहे.

तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणेस गरम आणि थंड पाणी एकद्सोबत प्यायल्याने शरीरासाठी घातक आहे. त्यांनी सांगितलं की, थंड पाणी पचनासाठी जड असते. तर गरम पाणी हलके असते. जेव्हा हे दोन्ही पाणी एकत्र प्यायले जाते तेव्हा त्याचा पचनावर त्याचा परिणाम होतो.

काय होतो परिणाम

यासोबतच गरम पाण्यात बॅक्टेरिया नसतात तर थंड पाणी हे दूषित असते. यामुळे थंड आणि गरम पाणी हे शरीरासाठी, आरोग्यासाठी घातक असते. गरम पाणी वात आणि कफ शांत करतो तर थंड पाणी दोन्ही गोष्टी वाढवण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे हे पाणी पित्त दोष खराब करण्यास मदतच होते.

गरम आणि थंड पाणी मिक्स करुन प्यायल्याने पचनक्रिया बिघडते. एवढंच नव्हे तर पोठ फुगते एवढंच नव्हे तर शरीरातील पित्ताचे प्रमाण अधिक वाढते.

कोमट पाणी रक्त वाहिन्यांना पसरवते आणि साफ करते. तर थंड पाणी रक्त वाहिन्यांना संकुचित करते. यामुळे थंड आणि गरम किंवा कोमट पाणी शरीरासाठी घातक ठरते. यामुळे हे पाणी थेट तुमच्या पचनक्रिया आणि पोटावर परिणाम करते.

याशिवाय पाणी उकळण्याची प्रक्रिया केल्याने ते हलके आणि बॅक्टेरियामुक्त तर होतेच, पण त्यात औषधी गुणधर्मही आहेत ज्यामुळे ते पूर्णपणे स्वच्छ होते आणि आरोग्य सुधारते. तज्ज्ञांनी म्हटल्याप्रमाणे, गरम पाण्यात थंड पाणि मिसळल्याने खूप प्रमाणात याचे बदल होतात.

तर मग कसे पाणी प्यायला हवे?

मातीच्या भांडीत ठेवलेलं पाणी प्यायल्याने ते अमृतासमान असते. हे पाण्याला मूळ स्वभावापेक्षा थंड आणि शुद्ध ठेवते. एवढंच नव्हे तर या पाण्यात खनिजांचे प्रमाण मोठ्या प्रम ाणावक असते. मातीच्या भांड्यात एक सुसंगत. मध्यम तापमान बनवून ठेवण्यासाठी याचा फायदा होत असल्याच आयुर्वेदात म्हटलं आहे.

मातीच्या भांड्यातील पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण मुबलक प्रमाणात असते. मातीच्या भांड्यातील पाणी हे थंड राहण्यास मद केले. एवढेच नव्हे तर शरीर देखील या पाण्यामुळे समतोल राहते.

# लातूरच्या बसस्थानक व डेपो स्थलांतरणाचा प्रश्र्न तात्काळ मार्गी लावावा:



लातूर प्रतिनिधी) :लातूर शहर शिक्षण, कृषी आणि व्यापाराचे प्रमुख केंद्र बनले असून, शहरात दररोज ८०० ते ९०० बसची ये-जा असते. प्रवाशांची वाढती संख्या पाहता सध्याचे मध्यवर्ती बसस्थानक अपुरे पडत असून, त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पार्किंग व्यवस्थेसह सुसज्ज बसस्थानक उभारण्यात यावे, त्याचबरोबर लातूर येथून महत्त्वाच्या शहरासाठी अद्यावत इलेक्ट्रिक बस सुरू कराव्यात यासह विविध मागण्या राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रतापजी सरनाईक यांच्याकडे त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीदरम्यान केल्या आहेत. त्यांनी या सर्व मागण्यांना अनुकूलता दर्शवत संबंधितांना सूचना केल्या आहेत.

परिवहन विभागाच्या संदर्भाने लातूर शहर व जिल्ह्यातील विविध मागण्यांची निवेदने परिवहन मंत्री ना. प्रतापजी सरनाईक यांच्याकडे वेळोवेळी देण्यात आली आहेत, या सर्व निवेदनावर विचार करून निर्णय घेण्यासाठी त्यांनी आज बुधवार दि. ९ जुलै २५ रोजी त्यांच्या दालनात संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते.

परिवहन मंत्र्यांच्या दालनात आढावा बैठक:

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील परिवहन विभागाच्या विविध प्रश्र्नांची सोडवणूक करण्यासाठीची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी झालेल्या बैठकीत आमदार देशमुख यांनी बसस्थानकाचे बी.ओ.टी. तत्त्वावर बहुमजली पार्किंग व्यवस्थेसह त्वरित नूतनीकरण करण्यात यावे, ज्याला यापूर्वीच मंजुरी मिळाली आहे असे सांगीतले. तर एस.टी. डेपो स्थलांतर संदर्भात ते म्हणाले, लातूर शहराचा विस्तार झाल्याने छत्रपती शिवाजी महाराज चौकानजीक असलेला एस.टी. डेपो आता शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आला आहे, ज्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एस.टी. डेपो अंबाजोगाई रोडवरील वर्कशॉप नजीक स्थलांतरित करावा आणि त्याठिकाणी असलेले बसस्थानक क्र. २ छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्थलांतरित करावे.

लातूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत जुनी झाली असून, तिच्या दुरुस्तीसाठी ७८ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एस.टी. डेपोतून बसचालकांना बसस्थानकाबाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी हा भाग असल्याने वाहन पार्किंगची मोठी अडचण आहे. अंबाजोगाई रोडवरील बसस्थानक क्र. २ मध्ये फक्त अंबाजोगाईकडे जाणाऱ्या बस थांबतात, ज्यामुळे प्रवाशांना शहरात ये-जा करणे गैरसोयीचे ठरते आणि या बसस्थानकातून प्रवाशांचा प्रतिसाद कमी मिळतो.

अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांची अडवणूक:

लातूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक महामार्गांवर शेतमालाची वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाहनांची अडवणूक करून परिवहन अधिकारी पैशाची मागणी करतात, अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशीही मागणी यावेळी करुन लातूर जिल्ह्यात वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र देण्यासाठी २ हजार रुपये एका वाहनाला द्यावे लागतात. पैसे दिले नाहीत तर परिवहन अधिकारी त्रुटी काढतात, हा एक प्रकारे लाच घेण्याचा प्रकार आहे. अशा अधिकाऱ्यांवर देखील कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली. यावेळी सर्व मागण्यावर सवीस्तर चर्चा होवून या सर्व प्रश्र्नांची तातडीने सोडवणूक केली जाईल, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली.

# फोन वापरताना मध्येच ब्रेक घ्यावासा वाटतो; जाणून घ्या काय आहे 'डू नॉट डिस्टर्ब सेटींग'...




आजकाल जवळपास प्रत्येक व्यक्ती स्म ार्टफोनमध्ये गुंतलेली असते. प्रत्येकाची स्मार्टफोन वापरण्याची वेगवेगळी कारणं आहेत. वापरकर्त्यांची गरज लक्षात घेऊन सेटींगमध्ये अनेक उत्तम पर्याय उपलब्ध आहेत. यापैकी एक सेटींग म्हणजे 'डू नॉट डिस्टर्ब' सेटिंग. जाणून घ्या काय आहे नेमकी सेटींग.

'डू नॉट डिस्टर्ब' सेटींग असं काम करते : 'डू नॉट डिस्टर्ब' सेटिंगसह, स्मार्टफोन वापरकर्ता काही काळ फोनमधून ब्रेक घेऊ शकतो. 'डू नॉट डिस्टर्ब' सेटींगसह, वापरकर्त्याच्या फोनवर येणाऱ्या सूचना काही काळासाठी सायलेंट केल्या जाऊ शकतात. हे सेटींग ऑन केल्यानंतर फोनवर येणाऱ्या नोटिफिकेशन्समुळे फोन वाजत नाही किंवा फोन व्हायब्रेट होत नाही. 'डू नॉट डिस्टर्ब सेटींग' प्रत्येक स्मार्टफोनवर थोड्या वेगळ्या पद्धतीने कार्य करते. या सेटींगमुळे अनेक स्मार्टफोनमध्ये लॉक स्क्रीनवरही सूचना मिळणं बंद होतं. या सेटींगची एक चांगली गोष्ट म्हणजे यामुळे वापरकर्त्याच्या महत्त्वाच्या नोटिफिकेशन्स मिस होत नाहीत. जेव्हा 'डू नॉट डिस्टर्ब सेटींग' सुरु असतं, तेव्हा फोन रिंग होत नाही, परंतू फोनवर सूचना येत राहतात.

कशी ऑन करा 'डू नॉट डिस्टर्ब सेटींग' :

प्रत्येक स्म ार्टफोनच्या क्विक सेटींगमध्ये 'डू नॉट डिस्टर्ब' सेटींगचा पर्याय असतो.

'डू नॉट डिस्टर्ब' सेटींग ऑन करण्यासाठी, प्रथम तुम्हाला फोनची होमस्क्रीन खाली स्वाइप करा.

स्क्रीनवर पुन्हा खाली स्वाइप करा.

आता स्क्रीन डावीकडे स्वाइप करावी.

येथे डू नॉट डिस्टर्बचा आयकॉन दिसेल.

या पर्यायावर टॅप करून तुम्ही सेटींग ऑन करू शकता. सेटींग पर्यायांना त्रास देऊ नका : 'डू नॉट डिस्टर्ब' सेटींगवर अधिक वर टॅप करून तुम्ही तुमच्या सोयीनुसार हे सेटींग सेट करू शकता. सेटींगमध्ये, सूचनांना परवानगी द्या, संदेशांना परवानगी द्या, कॉल्सला परवानगी द्या आणि डीएनडी चालू असताना सायलंस मीडियाचे पर्याय उपलब्ध आहेत.

# जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवाराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आग्रही निवेदन



लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी राज्य शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी देऊन यासाठी लागणारा मोबदला रुपये ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास वर्ग देखील केला आहे. आता ही जागा आरोग्य विभागाच्या ताब्यात आली असून अजून या बहुप्रतिक्षित आस्थापनेचे भूमिपूजन झालेले नाही. विशेष बाब म्हणून लातूर जिल्हा रूग्णालय इमारतीचे भूमिपजन करून बांधकाम सुरू करावे अशा विनंतीचे निवेदन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माझं लातूर परिवाराच्या वतीने देण्यात आले. लातूरच्या प्रभारी जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्यामार्फत हे निवेदन देण्यात आले.

सन २०१२ साली राज्य शासनाने मंजूर करूनही आजतागायत लातूर जिल्हा रूग्णालय अस्तित्वात आले नाही. जिल्हा रूग्णालय व्हावे यासाठी माझं लातूर परिवाराने गत २ वर्षांपासून निरंतर लढा दिला आहे. ऐतिहासिक साखळी उपोषण, मंत्रालयात जाऊन तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी यांना साकडे देखील घातले होते.

राज्याचे संवेदनशील, जाणकार मुख्यमंत्री म्हणून आपण हा प्रश्र्न त्वरित मार्गी लावला मात्र दुर्दैवाने अजूनही हा विषय प्रशासनाच्या लालफितीत अडकून आहे. राज्याचे प्रमुख म्हणून आपण घेतलेल्या निर्णयाचा सन्मान झाला पाहिजे. प्रलंबित लातूर जिल्हा रूग्णालय भूमिपूजन करून प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झाली पाहिजे यासाठीचे आदेश तात्काळ प्रशासनास देऊन लातूर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना उपकृत करावे अशी विनम्र विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

दिनांक २९/५/२०२५ च्या शासन निर्णयामुळे लातूर जिल्हा रूग्णालय बांधकामास तांत्रिक अडचण येत आहे. नैसर्गिक न्यायानुसार आणि जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यासाठी विशेष बाब म्हणून लातूरला जिल्हा रूग्णालय तात्काळ सुरू करावे अशी मागणी करण्यात आली.

माझं लातूर परिवाराच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर सतीश तांदळे, अभय मिरजकर, दिपरत्न निलंगेकर, डॉ सितम सोनवणे, संजय शेटे, लिंबराज पन्हाळकर, प्रकाश कंकाळ, यशवंत पवार, शिरीषकुमार शेरखाने, डी उमाकांत, सोमनाथ मेदगे, राम रोडगे, सागर तापडिया, विष्णु आष्टीकर, योगेंद्र कलुरे, रत्नाकर निलंगेकर, श्रीराम जाधव, नितीन बनसोडे, ऋषी होळीकर, सुनील गवळी, अंबादास करकरे, विजय कवाळे, पुरुषोत्तम पाटील आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या वतीने महारोजगार मेळाव्याचे आयोजन



अहमदपूर - महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या वतीने अहमदपूर - चाकूर विधानसभा मतदारसंघातील युवक युवतींसाठी महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त युवक युवतींनी नाव नोंदणी करावी असे आवाहन सिद्धी शुगर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अविनाश जाधव व शिरूर ताजबंदचे उपसरपंच सुरज पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की , महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे कायम तरुणांना रोजगार मिळावा याच हेतूने विविध ठिकाणी युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात. याचाच एक भाग म्हणून नामदार बाबासाहेब पाटील यांच्या वतीने अहमदपूर आणि चाकूर तालुक्यातील युवक -युवतींना रोजगार मिळावा या उद्देशाने त्यांच्या वतीने महारोजगार मेळाव्याचे आयोजन रविवार दिनांक २० जुलै रोजी शिरूर ताजबंद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात करण्यात आले आहे. या मेळाव्यात पाचवी उत्तीर्ण, दहावी, बारावी,बीए, बीकॉम,एमबीए,आयटीआय, डिप्लोमा, इंजीनियरिंग इत्यादी शाखेत उत्तीर्ण असलेल्या सर्व विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. त्यासाठी त्यांनी त्यांचा जन्म दाखला,आधार कार्ड,गुणपत्रिका व पासपोर्ट आकाराचा फोटो सह अहमदपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी अहमदपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संपर्क कार्यालयात नोंदणी करावी तसेच चाकूर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी चाकूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संपर्क कार्यालयात नाव नोंदणी करावी असे आवाहन अविनाश जाधव व सुरज पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एम एस बिडवे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे प्रथम वर्षात दैदिप्यमान यश

लातुर : नुकताच प्रथम वर्ष पॉलिटेक्निकचा निकाल जाहीर झाला असुन विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणपत्रिकाही उपलब्ध झाल्या आहेत. प्रथम वर्ष पॉलिटेक्निकच्या तब्बल ११ विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण घेत विक्रम नोंदविला आहे. चि. आदित्य पाटील, कु. सई सोणवने, चि.वेदांत कुर्ले, कु. बेबिका पाटील, कु. अक्षता क्षिरसागर, कु. अदिबा कासार, कु. प्रांजली टिकोणे, चि. वेदांत शिंदे, कु. स्नेहल सोणवने, कु. जान्हवी पडिले आणि कु. गायत्री बिरादार या विद्यार्थ्यांनी गणित विषयात पैकीच्या पैकी गुण घेत एक किर्तीमान स्थापन केला आहे.

या यशाबद्दल महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सौ ज्योती पाटील तसेच डिप्लोमा प्रभारी प्रा सुरज बिराजदार यांनी या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करत विषय शिक्षक प्रा. तानाजी सोणवने व प्रा.पंकज कोरे यांचेही कौतुक केले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894